0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २५/०७/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४८/२०१२/जा.५०३, दिनांक २५/०७/२०१२, ०७/०८/२०१२, १६/०८/२०१२ व २३/०८/२०१२.

३) सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ३१/०७/२०१२ रोजीचे अभिवेदन.

४) मे. कामधेनू इंटरप्रायझेसचे भागीदार मनोज नानजी भानुशाली यांचे दि. १६/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

५) सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक १६/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

६) मे. कृपा ट्रेडर्स, मे. शहा सप्लायर्स, मे. आशापुरा ट्रेडर्स, मे. धीरजलाल वीरजी ॲण्ड कंपनी, मे. एस.के. ॲण्ड कंपनी, मे. अक्षर कॉर्पोरेशन, मे. अरविंद ट्रेडिंग, मे. महावीर ट्रेडर्स, मे. चंदरकुमार ओमप्रकाश, मे. शुभम फुडस्, मे. रघुवीर राईस ट्रेडर्स, मे. राजेश्वर ट्रेडर्स, मे. भद्रा ट्रेडिंग कंपनी, मे. वरदान राईस ट्रेडर्स, मे. कटारीया कॉर्पोरेशन व मे. प्रकाश कॉर्पोरेशन यांचे दिनांक २२/०८/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

७) या कार्यालयाचे पत्र" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४८/२०१२/जा.५८९, दि. २४/०८/२०१२.

८) मे. ओम सोम फुडस् व मे. पुजा ट्रेडिंग कंपनी यांचे दि. २९/०८/२०१२ रोजीचे स्वतंत्र निवेदने.

९) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा दिनांक २९/०८/२०१२ रोजी प्राप्त अहवाल.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४८/२०१२/जा. ६२९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरंस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : ०५/०९/२०१२.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २१/०७/२०१२ रोजी या कार्यालयास, मे. कामधेनू इंटरप्रायझेस, प्लॉट नं. ४६, सेक्टर १९ अे, वाशी, नवी मुंबई या वेअरहाऊसमध्ये तांदळाची विनापरवाना साठवणूक होत असल्याबाबत मिळालेल्या खात्रीलायक बातमीची खातरजमा करण्यासाठी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचासह

सायंकाळी ०६.१५ वाजता प्लॉट नं. ४६, सेक्टर १९ ए, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी गाळा असलेला कामधेनू इंटरप्रायझेस येथे पोहचले. गाळ्यात शिरल्या क्षणी एक इसम तेथील खुर्चीवर बसलेला आढळला. सदर इसमास त्याचे नांव विचारले असता, त्यांनी त्याचे नांव श्री. मनोज नानजी भानुशाली असे असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदर इसमास ओळख करुन दिली व भेटीचे प्रयोजन सांगितले.

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष गोदामात असलेल्या साठ्याविषयी विचारणा केली असता, त्यांनी सदर गोदामात तांदळाच्या साठ्याची साठवणूक करुन ठेवल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष गोदामात साठवणूक करुन ठेवलेल्या साठ्याबाबत परवान्याची मागणी केली असता, सदर परवाना त्याच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगून सदरबाबत त्यांच्याकडे गुमास्ता परवाना असून तो सध्या उपलब्ध नाही, असे उपस्थित व्यक्तीने अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष वेअरहाऊसमध्ये साठवणूक करुन ठेवलेल्या मालाच्या परवानाधारकांच्या बिलांबाबत विचारणा केली असता, सदर माल हा त्यांचा नसून एपीएमसी मार्केटमधील व्यापाऱ्यांचा असून तो फक्त साठवणूक करुन त्यांनी दिलेल्या पत्रानुसार नोंदवहीमध्ये नोंदी करुन ठेवण्यात येतो. त्याबाबत त्याला प्रत्येक गोणीमागे प्रति महिना रुपये ४/- या दराने मोबदला मिळतो. माल सुस्थितीत व खराब होणार नाही याची दक्षता जो व्यापारी वेअरहाऊसमध्ये माल ठेवतो तोच काळजी घेतो, असे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचामसक्ष उपस्थित श्री. मनोज नानजी भानुशाली यांच्या समक्ष साठ्याची मोजदाद केली असता, ती खालीलप्रमाणे आढळली.

| अ. क्र. | व्यापाऱ्यांचे नांव | धान्य प्रकार | कट्टा ३०/५०/२५ कि.ग्रॅ. | एकूण वजन किलो | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | कृपा ट्रेडर्स | तांदूळ | १३०८ | ३२७०० | ११,४४,५००/- |
| २ | ओम सोम फुड | तांदूळ | ११३० | ५६५०० | १९,७७,५००/- |
| ३ | शहा सप्लायर | तांदूळ | ४२७ | १०६७५ | ३,७३,६२५/- |
| ४ | प्रकाश कॉर्पोरेशन | तांदूळ | ८३६ | २०९०० | ७,३१,५००/- |
| ५ | आशापुरा | तांदूळ | २९८८ | ७४७०० | २६,१४,५००/- |
| ६ | धीरजलाल वीरजी | तांदूळ | १२७७ | ३१९२५ | ११,१७,३७५/- |
| ७ | पुजा ट्रेडिंग | तांदूळ | ५३४ | १३३५० | ४,६७,२५०/- |
| ८ | एस.के. ॲण्ड कंपनी | तांदूळ | ८३५४ | २१०५७५ | ७३,७०,१२५/- |
| ९ | अक्षर कॉर्पोरेशन | तांदूळ | १०९५ | २७३७५ | ९,५८,१२५/- |
| १० | अरविंद ट्रेडिंग | तांदूळ | ६५१९ | १६२९७५ | ५७,०४,१२५/- |
| ११ | महावीर ट्रेडर्स | तांदूळ | १४०५ | ४०५४५ | १४,१९,०७५/- |
| १२ | ओमप्रकाश सोमनाथ | तांदूळ | ५७४९ | १४९९५५ | ५२,४८,४२५/- |
| १३ | शुभम फुडस | तांदूळ | २३९३ | ५९८२५ | २०,९३,८७५/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | रघुवीर ट्रेडर्स | तांदूळ | २०० | ५००० | १,७५,०००/- |
| १५ | राजेश्वर ट्रेडर्स | तांदूळ | ६३२४ | १७९९७० | ६२,९८,९५०/- |
| १६ | भद्रा ट्रेडर्स | तांदूळ | ५२९ | १५८७० | ५,५५,४५०/- |
| १७ | वरदान राईस | तांदूळ | १६९४ | ५०८२० | १७,७८,७००/- |
| १८ | कटारीया कॉर्पोरेशन | तांदूळ | ३८७ | ९६७५ | ३,३८,६२५/- |
| | | एकूण | ४३१४९ | ११५३३३५ | ४,०३,६६,७२५/- |

0003

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष उपरोक्त व्यापाऱ्यांनी वेअरहाऊसमध्ये साठवणूक केलेल्या तांदळाच्या बिलांबाबत तसेच परवान्यांच्या छायांकित प्रती अथवा वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याबाबत संबंधित प्राधिकारणाकडून प्राप्त परवानगीच्या प्रतींबाबत विचारणा केली असता, याबाबतचे कोणतेही कागदपत्र त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. गोदामात साठवणूक केलेला तांदूळ हा विनापरवाना तसेच साठवणूकीचा परवान्याशिवाय केलेला असल्याचे उपस्थित मनोज नानजी भानुशाली यांनी पंचासमक्ष मान्य केले आहे. याबाबतचा अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष उपस्थित मनोज नानजी भानुशाली यांचा घडल्या परिस्थितीनुसार जबाब नोंदवून घेतला.

अशाप्रकारे मे. कामधेनू इंटरप्रायझेसचे भागीदार मनोज नानजी भानुशाली व इतर भागीदार यांनी संगनमताने जीवनावश्यक वस्तूंची विनापरवाना साठेबाजी करुन जादा नफेखोरीच्या उद्देशाने साठवणूक केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ च्या तरतुदींचा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०५९/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून जीवनावश्यक वस्तुंमधील अन्नधान्य या अनुसूचीत वस्तूंचा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केलेला विनापरवाना साठा शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक ३१/०७/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. काटकर यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले व तपास सुरु असल्याने सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. तसेच सदर सुनावणीस मे.

कामधेनू इंटरप्रायझेसचे मालक मनोज नानजी भानुशाली हे तसेच त्यांच्या वतीने ॲड. श्री. सुनिल एन. मोकल वकालतनाम्यासह उपस्थित राहिले व त्यांनी लेखी निवेदन सादर करण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १४/०८/२०१२ रोजी ठेवण्याची विनंती केली. तसेच सदरचा जप्त साठा हा इतर व्यावसायीक यांचा असल्याचे सांगून त्या अनुषंगाने विविध आस्थापनांसोबत साठवणूकीकरिता करारनामा नसल्याचे सांगितले. जप्त साठ्याबाबत त्यांना अधिक विचारणा केली असता ते अनभिज्ञ असल्याचे सांगून साठा मालकच याबाबतची माहिती व साठा संबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रे सादर करु शकतील असे सांगितले. सबब, मे. कामधेनू इंटरप्रायझेसचे मालक तसेच नमूद गोदामातील जप्त साठ्याचे मालकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १४/०८/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १४/०८/२०१२ रोजीची सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २२/०८/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. कामधेनू इंटरप्रायझेसचे मालक मनोज नानजी भानुशाली यांनी उपस्थित राहून यापूर्वी वाचावे क्र. ४ अन्वये दिलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीस मे. कृपा ट्रेडर्सचे मालक गोपाल जेठालाल गजरा, मे. शहा सप्लायरचे मालक विजय मोहनलाल शहा, मे. प्रकाश कॉर्पोरेशनचे मालक अनिल हिरालाल भद्रा, मे. आशापुराचे मालक गोपाळ जेठालाल गजरा, मे. धीरजलाल वीरजी ॲण्ड कंपनीचे मालक धिरजलाल विरजी मारु, मे. एस.के. ॲण्ड कंपनीचे मालक युवराज पोपटलाल भंडारी, मे. अक्षर कॉर्पोरेशनचे मालक वसंत शंभुलाल हरवरा, मे. अरविंद ट्रेडिंगचे मालक अरविंद कोरशी शहा, मे. महावीर ट्रेडर्सचे मालक पोपटलाल भंडारी, मे. चंदरकुमार ओमप्रकाशचे मालक चंदरकुमार ओमप्रकाश मुरगई, मे. शुभम फुडसचे मालक दिपक रमेश मेहता, मे. रघुवीर ट्रेडर्सचे मालक प्रताप प्रेमजी कटारमल, मे. राजेश्वर ट्रेडर्सचे मालक दामजी मुरजी गोरी, मे. भद्रा ट्रेडर्सचे मालक अरविंद नानजी भद्रा, मे. वरदान राईसचे मालक वालजी ठाकरशी गजरा, मे. कटारीया कॉर्पोरेशनचे मालक रामजी मनजी कटारीया यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ६ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. मे. कृपा ट्रेडर्स तथा मे. आशापुराचे मालक गोपाळ जेठालाल गजरा यांनी सदरचे दोन्ही आस्थापनांचे ते एकमेव मालक असल्याचे सांगून त्यांनी अनुक्रमे घाऊक परवाना क्र. ६३२ व ९३ हे दोन एकाच पत्त्यावरील घाऊक परवाने सादर केले. याबाबत फ परिमंडळ कार्यालयास पुढील कार्यवाहीबाबत निर्देशित करण्यात आले आहे. मे. कटारीया कॉर्पोरेशनचे मालक रामजी मनजी कटारीया यांनी सुनावणी दरम्यान त्यांचा जप्त असलेला साठा हा बाजरी नसून तांदूळ असल्याचे सांगितले. सदर सुनावणीस मे. ओमसोम फुड व मे. पुजा ट्रेडिंगचे मालक अथवा त्यांचे वतीने प्राधिकृत प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित

0005

राहिले नाहीत. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २९/०८/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २२/०८/२०१२ रोजी मे. कामधेनू इंटरप्रायझेसचे मालक मनोज नानजी भानुशाली यांनी या कार्यालयात ठेवण्यात आलेल्या सुनावणीचे वेळी सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेल्या साठ्याचे धुरीकरण (fumigation) करण्याची परवानगी मागितल्याने नमूद वेअरहाऊसमधील जप्त साठा हा किड लागुन खराब होवू नये म्हणुन धुरीकरण (fumigation) करण्यास परवानगी देण्याबाबत तसेच सदर साठ्याची धुरीकरण (fumigation) झाल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी जतन करुन ठेवण्याबाबत या कार्यालयाचे वाचावे क्र. ७ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले.

दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. ओम सोम फुडचे मालक मोहित मुरगई व मे. पुजा ट्रेडर्सचे मालक परेश लालजी विंदे यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ८ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. काटकर यांनी युक्तीवाद केला की, एकंदरीत झालेल्या तपासावरुन यातील अटक आरोपी यांनी आपसांत संगणमत करुन त्यांचे कामधेनू इंटरप्रायझेस मध्ये ४,०३,६६,[illegible]/- रुपये किंमतीचा अन्नधान्याचा साठा शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न होत आहे. यातील अटक आरोपी याने त्याचे व्यवसायात त्याचे भागीदार कोण आहेत. तसेच त्याने कोणाकोणाकडून सदरचा माल भाडेतत्त्वार ठेवण्यास घेतला आहे. त्याचेकडे इतर कोणते परवाने आहेत. याबाबत काहीही माहिती दिलेली नाही. अटक आरोपी याने सदर गुन्ह्याचे तपासकामी कोणत्याही प्रकारे सहकार्य केलेले नसून गुन्ह्याचा तपास चालू असून यातील नमूद १८ व्यापाऱ्याकडे यातील मालाबाबत विचारपूस करुन जबाब नोंदविणे बाकी आहेत. त्याकरता सदर गुन्ह्यात त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्यासाठी १५ दिवस मुदत वाढवून मिळणेस विनंती करुन तसे लेखी अभिवेदन सादर केले.

मे. कामधेनू इंटरप्रायझेसचे भागीदार मनोज नानजी भानुशाली यांचे दिनांक १६/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्यांच्या वेअरहाऊसमध्ये अन्नधान्याचे व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांनी शिधावाटप यंत्रणेच्या नियमांचा भंग केल्याने कारवाई करुन मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असल्याने त्यांचा साठा शासनजमा करण्यात का येऊ नये, याबाबत विचारणा करण्यासाठी

साठामालकांना सुनावणीस पाचारण करण्यात यावे. घटनास्थळी त्यांच्याकडे गुमास्ता परवाना व्यतिरिक्त इतर आवश्यक परवाना नसल्याने कारवाई करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेला वेअरहाऊसमधील साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असून त्यांच्याकडे वेअरहाऊसमध्ये साठवणूक करण्याकरिता आवश्यक परवाना आहे. त्यामुळे त्यांचा काहीही संबंध नसल्याने त्यांचे वेअरहाऊस सिलमुक्त करण्याची विनंती केली. जीवनावश्यक वस्तू कायदाचे कलम ६-अ चा उल्लघंन केल्याचे नमूद करुन त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. यामध्ये तत्थ नसुन सदरचा साठा इतर व्यक्तींचा असून त्यांच्याकडे साठवणुकीचा परवाना असल्याने त्यांनी सदर साठ्याची त्यांच्या वेअर हाऊसमध्ये साठवणूक करण्याची परवानगी देऊन कोणत्याही नियमांचा भंग केला नसल्याचे नमूद केले. ते घाऊक व्यापारी नसून ते वेअर हाऊसकिपर असल्याने त्यांना शिधावाटप यंत्रणेचा कायदा लागू होत नाही. त्यामुळे शिधावाटप यंत्रणेच्या कायद्यानुसार वेअर हाऊसमधील साठा जप्त करण्याचा अधिकार नाही. सदर वेअर हाऊसमध्ये जीवनावश्यक वस्तू नसल्याने जर घटनास्थळी जीवनावश्यक वस्तूचा साठा मिळाला असता तर साठा जप्त करण्याचे अधिकार असल्याचे नमूद केले आहे. घटनास्थळी शिधावाटप अधिकाऱ्यांनी गोदामातील साठा नमूद करुन तो गोदामातील त्यांच्या अभिलेखाशी ताडून पाहिला आहे. तरी वेअर हाऊसमधील जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्यात यावा व धुरीकरण करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. काटकर यांचे दिनांक १६/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, यातील अटक आरोपी यांचे कामधेनू वेअरहाऊसमध्ये मिळून आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असून सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा नमुद व्यापाऱ्यांचा असून त्यांचा सदरचा साठा यातील अटक आरोपी यांनी शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) व इतर परवाने नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. तरी नमूद धान्याच्या साठ्याबाबत योग्य तो आदेश होणेस विनंती करुन तसे लेखी अभिवेदन सादर केले आहे.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. कृपा ट्रेडर्सचे मालक गोपाल जेठालाल गजरा यांनी युक्तीवाद केला की, त्यांचेकडे साठवणुकीस जागा नसल्याने त्यांनी त्यांचा नमुद गोदामात साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिल, संयुक्त घाऊक परवाना, गुमास्ता परवाना, अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना, कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना, विवरणपत्र व साठवणुक पावती इत्यादी सादर केले असुन त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. शहा सप्लायर्सचे मालक विजय मोहनलाल शहा यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ४ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता

त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ४१८ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. कामधेनु वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, गुमास्ता परवाना, कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना, विवरणपत्र व करारनाम्याच्या छायांकित प्रती सादर केले असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. आशापुरा ट्रेडर्सचे मालक गोपाळ जेठालाल गजरा यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा नमुद गोदामात साठा जप्त असुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिल, संयुक्त घाऊक परवाना, गुमास्ता परवाना, अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना, कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना व साठवणुक पावती इत्यादी सादर केले असुन मे. कामधेनू वेअरहाऊसमध्ये त्यांनी जागेच्या कमतरतेमुळे त्यांचा साठा साठवणूक केला असल्याचे नमूद केले व त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. धीरजलाल वीरजी अॅण्ड कंपनीचे मालक धिरजलाल विरजी मारु यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ३४ वर्षापासुन अन्नधान्याचा व्यवसाय करीत असुन ते ग्रोमा व इतर संस्थेचे सभासद आहे. सदर व्यवसायाकरीता शिधावाटप विभागाव्यतिरीक्त इतरही परवाने धारण केले असुन त्याकरीता त्यांनी साठापुस्तक ठेवल्याचे नमुद करुन मासिक विवरणपत्रही सादर करत असल्याचे सांगितले. मे. कामधेनु इन्टरप्राईज येथे २५ किलो क्षमतेच्या १४७१ बाचक्यांमधील तांदळाचा साठा साठवणुक केला असुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिल, संयुक्त घाऊक परवाना, गुमास्ता परवाना, अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना, कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना व साठवणुक पावती इत्यादी सादर केले असुन त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. एस.के. अॅण्ड कंपनीचे मालक युवराज पोपटलाल भंडारी यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी कामधेनु वेअरहाऊस वाशी येथे साठवणुक केलेल्या तांदळाच्या साठयाच्या पुराव्यादाखल खरेदीबिले, वेअरहाऊसचे गेटपास, शिधावाटप परवाना व अतिरीक्त गोदाम नोंदीसाठी केलेला अर्ज या सर्व दस्ताऐवजांच्या छायांकित प्रती सादर करुन त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. अक्षर कॉर्पोरेशनचे मालक वसंत शंभुलाल हरवरा यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी यापुर्वी २१/०३/२०११ रोजी अन्नधान्य व कडधान्यांच्या परवाण्यासाठी अर्ज केला असुन सदर अर्जास शिधावाटप विभागाकडून प्रतिसाद न मिळाल्याने त्यांचे भागिदार किर्ती भानुशाली यांनी ठाणे व

वाशी येथील शिधावाटप कार्यालयात भेट देवून अर्जाच्या सद्यस्थितीबाबत विचारणा केली असता त्यांना अपेक्षित प्रतिसाद शिधावाटप विभागाकडून मिळाला नसल्याचे सांगितले. दरम्यानच्या काळात अर्ज केल्याने ते व्यवसायास पात्र असल्याचे गृहित धरुन त्यांनी त्यांचा व्यवसाय सुरु ठेवला असुन त्यांचेकडे अन्न औषध प्रशासन, नविमुंबई महानगरपालिका, गुमास्ता परवाना, वॅट नोंदणी प्रमाणपत्र असल्याचे सांगितले. घाऊक परवाण्यासाठी अर्ज केला असल्याने त्यांनी महाराष्ट्र अनुसुचीत वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ च्या तरतुदींचा भंग केला नसल्याचे सांगुन त्यांचेकडून सदर परवाण्याकरीता पुर्तता केली आहे. घाऊक परवान्याशिवाय व्यवसाय सुरु ठेवल्यास परवाना आदेशामधील तरतुदींचा भंग होत असल्याचे ज्ञात झाल्याने त्यांनी व्यवसाय बंद केला असल्याचे सांगुन सदर परवान्याकरीता त्यांनी दिनांक २२/०७/२०१२ रोजी पुन्हा अर्ज केल्याचे सांगितले. सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिल, संयुक्त घाऊक परवाना, गुमास्ता परवाना, अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना, कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना व साठवणुक पावती इत्यादी सादर केले असुन त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. अरविंद ट्रेडिंगचे मालक अरविंद कोरशी शहा यांनी युक्तीवाद केला की, त्यांचेकडे संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ४४१ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. कामधेनु वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, गुमास्ता परवाना, कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना, विवरणपत्र, सुचनापत्र व करारनाम्याच्या छायांकित प्रती सादर केले असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. महावीर ट्रेडर्सचे मालक पोपटलाल भंडारी यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी कामधेनु वेअरहाऊस वाशी येथे साठवणुक केलेल्या तांदळाच्या साठयाच्या पुराव्यादाखल खरेदीबिले, वेअरहाऊसचे गेटपास, शिधावाटप परवाना, अतिरीक्त गोदाम नोंदीसाठी केलेला अर्ज व करारनामा या सर्व दस्ताऐवजांच्या छायांकित प्रती सादर करुन त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. चंदरकुमार ओमप्रकाशचे मालक चंदरकुमार ओमप्रकाश मुरगई यांनी युक्तीवाद केला की, नोटीसमध्ये त्यांच्या आस्थापनेचे नांव चुकुन ओमप्रकाश सोमनाथ असे नमुद असुन त्यामध्ये सुधारणा करण्यात यावी असे सांगुन साठयाच्या पुराव्यादाखल खरेदीबिले, वेअरहाऊसचे गेटपास, शिधावाटप परवाना, अतिरीक्त गोदाम नोंदीसाठी केलेला अर्ज व करारनामा या सर्व दस्ताऐवजांच्या छायांकित प्रती सादर करुन त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.



CONTROLLER RATIONING HEAD MUM

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. शुभम फुडस्चे मालक दिपक रमेश मेहता यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा जप्त करण्यात आलेला साठा हा एपीएमसी वाशी तसेच पंजाब येथुन खरेदी केला असुन साठयाच्या पुराव्यादाखल खरेदीबिले सादर केली असुन त्यांचा खरेदी व विक्री चा व्यापार करण्याचे हेतु असल्याने त्यांचा काळेबाजारीचा उद्देश नसल्याचे सांगुन सद्यस्थितीत तांदळाच्या साठयाची कमतरता नसल्याने भारत सरकारने बासमती तांदळाच्या निर्यातीकरीता परवानगी दिली असुन त्यासोबत नॉन बासमती तांदळाच्या निर्यातसाठीही परवानगी आहे. साठयाच्या पुराव्यादाखल खरेदीबिले, वेअरहाऊसचे गेटपास, शिधावाटप परवाना, अतिरीक्त गोदाम नोंदीसाठी केलेला अर्ज व करारनामा या सर्व दस्ताऐवजांच्या छायांकित प्रती सादर केली असुन या व्यतिरीक्त साठयाच्या विमा पॉलिसी तसेच कामधेनु इन्टरप्रायजेस यांना भाडयापोटी देण्यात आलेल्या रकमेच्या तसेच बँक स्टेटमेंटही जोडण्यात आले आहे. तरी त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. रघुवीर राईस ट्रेडर्सचे मालक प्रताप प्रेमजी कटारमल यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ५ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ५३६ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. कामधेनु वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, मासिक व साठाविवरणपत्राच्या छायांकित प्रती सादर केले असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. राजेश्वर ट्रेडर्सचे मालक दामजी मुरजी गोरी यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ३ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ७६० आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. कामधेनु वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, करारनामा, विवरणपत्राच्या छायांकित प्रती सादर केले असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित भद्रा ट्रेडर्सचे मालक अरविंद नानजी भद्रा यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा नमुद गोदामात साठा जप्त असुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिल, संयुक्त घाऊक परवाना व साठवणुक पावती सादर केले असुन मे. कामधेनू वेअरहाऊसमध्ये त्यांनी जागेच्या कमतरतेमुळे

त्यांचा साठा साठवणूक केला असल्याचे नमूद केले व त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. वरदान राईस ट्रेडर्सचे मालक वालजी ठाकरशी गजरा यांनी युक्तीवाद केला की, ते मागील ८ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्याचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता त्यांचेकडे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ८८ आहे. सदर साठा त्यांनी त्यांच्या गोदामात अपुरी जागा असल्याने मे. कामधेनु वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे नमुद करुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, संयुक्त घाऊक परवाना, करारनामा, विवरणपत्रांच्या छायांकित प्रती सादर केले असुन आवश्यकतेनुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. कटारीया कॉर्पोरेशनचे मालक रामजी मनजी कटारीया यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा नमुद गोदामात साठा जप्त असुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिल, संयुक्त घाऊक परवाना व साठवणुक पावती सादर केले असुन मे. कामधेनू वेअरहाऊसमध्ये त्यांनी जागेच्या कमतरतेमुळे त्यांचा साठा साठवणूक केला असल्याचे नमूद केले व त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. प्रकाश कॉर्पोरेशनचे मालक अनिल हिरालाल भद्रा यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी त्यांचा माल कामधेनु वेअरहाऊस मध्ये भाडयाने उतरवला आहे त्या मालाची बिलची कॉपी अटॅच केल्याचे सांगुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. ओम सोम फुडचे मालक मोहित मुरगई यांनी युक्तीवाद केला की, कामधेनु वेअरहाऊस मधील साठवणुक केलेल्या तांदळाच्या साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, लॉरी बिल्टी, वेअरहाऊस गेटपास, शिधावाटप, गुमास्ता, एनएमएमसी व एपीएमसी परवाना तसेच अतिरीक्त गोदाम नोंदीसाठी केलेल्या अर्जाची छायांकित प्रत सादर केल्याचे सांगुन त्यांचा जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. पुजा ट्रेडिंग कंपनीचे मालक परेश लालजी विंदे यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा नमुद गोदामात साठा जप्त असुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिल, संयुक्त घाऊक परवाना व साठवणुक पावती सादर केले असुन मे. कामधेनू वेअरहाऊसमध्ये त्यांनी जागेच्या कमतरतेमुळे त्यांचा साठा साठवणूक केला असल्याचे नमूद केले व त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.



RATIONING HEAD ... MUMBAI

उपनियंत्रक शिधावाटप, फ. परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालात, जप्त साठ्याची साठामालकांकडे महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर, १९९८ अन्वये अन्नधान्य/कडधान्याच्या घाऊक व्यापाराकरिता आवश्यक असलेल्या परवाना साठा मालकानी धारण केला आहे किंवा कसे ? असल्यास त्याचे तपशिल, परवानाधारकाचा पत्ता, परवानावरील वेगळे गोदाम नमूद आहे किंवा कसे ? असल्यास त्यांचा तपशिल व नसल्यास जप्त करण्यात आलेल्या गोदामात साठा मालकांनी साठवणूक केल्याबाबतचे सुचनापत्र दिले आहे किंवा कसे ? तसेच परवाना असल्यास त्याची वैधता याबाबतचा साठामालक निहाय परिपूर्ण अहवाल सादर केला आहे.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २१/०७/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचांसह मे. कामधेनु इंटरप्रायझेस, प्लॉट क्र. ४६, सेक्टर १९ अे, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी टाकण्यात आलेल्या धाडीत विविध तांदळाचा साठा हा साठवणूकीच्या आवश्यक कागदपत्र व परवान्याशिवाय आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष जप्त करुन संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ च्या तरतुदींचा भंग केल्यावरुन ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०५९/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तसेच केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२७१६ (अ), दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ अन्वये तांदुळ या अनुसुचित वस्तूवर दिनांक ३०/११/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व

खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये देण्यात येणाऱ्या घाऊक परवानामधील "अट क्रमांक २(अ) नुसार अनुज्ञप्तधारक उपरोक्त व्यवसाय परवानामधील नमुद जागेत व्यवसाय करण्याबाबत" सुचित केले असुन, अट क्रमांक २(ब) नुसार "अनुज्ञप्तीधारक ज्याला उपरोक्त धंदा चालवावयाचा आहे. अनुसुचित वस्तुचा परवानामध्ये उल्लेखिलेल्या गोदामांव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी साठवणुक न करण्याबाबत" नमुद आहे. तसेच "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविले पाहीजे व अनुज्ञाप्ती, बदल करण्यासाठी, अनुज्ञाप्ती प्राधिकरणाला सादर केली पाहिजे" असे स्पष्ट नमुद केले आहे.

एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी यांचे टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, यातील अटक आरोपी यांचे कामधेनू वेअरहाऊसमध्ये मिळून आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असून सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा नमुद व्यापाऱ्यांचा असून त्यांचा सदरचा साठा यातील अटक आरोपी यांनी शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) व इतर परवाने नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. तरी नमूद धान्याच्या साठ्याबाबत योग्य तो आदेश होणेस विनंती असल्याचे सांगितले.

मे. कृपा ट्रेडर्स, मे. ओम सोम फुड, मे. आशापुरा ट्रेडर्स, मे. धिरजलाल विरजी ॲन्ड कंपनी, मे. एस के ॲन्ड कंपनी, मे. अरविंद ट्रेडिंग कंपनी, मे. महाविर ट्रेडर्स, मे. चंदरकुमार ओमप्रकाश व मे. शुभम फुड्स या सर्व आस्थापनांच्या मालकांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा नमूद गोदामात तांदळाचा साठा जप्त असून सदरचा साठा त्यांनी मे. कामधेनु इन्टरप्रायझेसच्या गोदामात साठवणुक केले असल्याचे सांगितले. निवेदनासोबत उपरोक्त साठामालकांनी विविध परवाने, जप्त साठ्याची खरेदी बिले, नमुद गोदामात साठवणुक केल्याबाबत अथवा कायमस्वरुपी अतिरीक्त गोदाम नोंदीकरीता केलेला अर्ज व इतर दस्ताऐवजांच्या सादर केलेल्या छायांकीत प्रतींचे अवलोकन करता सर्व आस्थापनांकडे महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये अन्नधान्याच्या व्यवसायाकरीता संयुक्त घाऊक परवाना आहे. सदरहु परवानाधारकांपैकी मे. एस. के. ॲन्ड कंपनी व

मे. महाविर ट्रेडर्स यांच्या संयुक्त घाऊक परवान्यावर अतिरीक्त गोदाम म्हणुन मे. कामधेनु इन्टरप्रायझेस या गोदामाची नोंद असुन उर्वरीत साठा मालकांच्या परवान्यांवर वेगळे गोदामाची नोंद नसल्याचे आढळून येते. अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." त्या अनुषंगाने इतर उर्वरीत साठामालकांनी त्यांच्या परवान्यावर मे. कामधेनु इन्टरप्रायझेस या अतिरीक्त गोदामाची नोंद करण्यासाठी अथवा सदर वेअरहाऊसवर त्यांचा साठा ठेवले असल्याबाबत त्यांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे या अनुज्ञप्ती प्राधिकारी यांच्या कार्यालयात सुचनापत्र सादर केल्याचे छायांकित प्रतींवरुन दिसुन येते. सदर सुचनापत्र/अर्जाबाबत उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या परवानाधारक निहाय परीपूर्ण अहवालात नमुद केले आहे. उपरोक्त साठा मालकांनी त्यांच्या परवान्यांवरील पत्यावर पुरेशा जागे अभावी त्यांनी त्यांच्या मालकीचा खरेदी केलेला परवानावरील साठा त्यांनी तात्पुरत्या स्वरुपात मे. कामधेनु इन्टरप्रायझेस यांच्या गोदामात साठवणुक केला असल्याचे नमुद केले आहे. सबब, नमूद आस्थापनांच्या मालकांनी त्यांना देण्यात आलेल्या परवान्यांमधील अटीं/शर्तींचे पालन करुन त्यांचा खरेदी केलेला तांदळाचा साठा हा अवैध साठवणुकीच्या उद्देशाने साठवणुक केल्याचे दिसुन येत नसल्याने मे. कृपा ट्रेडर्स, मे. ओम सोम फुड, मे. आशापुरा ट्रेडर्स, मे. धिरजलाल विरजी ॲन्ड कंपनी, मे. एस के ॲन्ड कंपनी, मे. अरविंद ट्रेडिंग कंपनी, मे. महाविर ट्रेडर्स, मे. चंदरकुमार ओमप्रकाश व मे. शुभम फुड्स या सर्व साठामालकांचा जप्त करण्यात आलेला तांदळाचा संपुर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. अक्षर कॉर्पोरेशनचे मालक वसंत शंभुलाल हरवरा यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांनी यापुर्वी [illegible]/०३/२०११ रोजी अन्नधान्य व कडधान्याच्या नविन परवान्यासाठी अर्ज केला असुन सदर अर्जास शिधावाटप विभागाकडून प्रतिसाद न मिळाल्याने त्यांचे भागिदार किर्ती भानुशाली यांनी ठाणे व वाशी येथील शिधावाटप कार्यालयात भेट देवून अर्जाच्या सद्यस्थितीबाबत विचारणा केली असता त्यांना अपेक्षित प्रतिसाद शिधावाटप विभागाकडून मिळाला नसल्याचे सांगून त्यांनी महाराष्ट्र अनुसुचीत वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ च्या तरतुदींचा भंग केला नसल्याचे सांगितले. घाऊक परवान्याशिवाय व्यवसाय सुरु ठेवल्यास परवाना आदेशामधील तरतुदींचा भंग होत असल्याचे ज्ञात झाल्याने त्यांनी व्यवसाय बंद केला असल्याचे सांगुन सदर परवान्याकरीता त्यांनी दिनांक २२/०७/२०१२ रोजी पुन्हा अर्ज केल्याचे सांगितले. सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले, गुमास्ता परवाना, अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना, कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना व साठवणुक पावती इत्यादी सादर करुन त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती केली.

0014 तथापी, मे. अक्षर कॉर्पोरेशनचे मालक यांनी मे. कामधेनू इंटरप्रायझेस या गोदामात २७३७५ किलो तांदळाचा साठा साठवणूक केला असून त्यांनी महाराष्ट्र अनुसुचीत वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये दिनांक २८/०३/२०११ रोजी जे-२२, एपीएमसी मार्केट २, फेस २, वाशी, नवी मुंबई या पत्त्यावर अन्नधान्य व कडधान्याच्या घाऊक परवान्याकरिता अर्ज केले असून सदर अर्जामध्ये मे. कामधेनू इंटरप्रायझेस या अतिरिक्त गोदामाची नोंद नसल्याचे दिसून येते. शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये अर्जदाराने अर्ज करतांना तपासणीसुची प्रमाणे सर्व कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असुन तसे न केल्यास अर्जदाराने या कागदपत्रांची ३० दिवसात पुर्तता करणे आवश्यक असल्याचे नमुद असुन त्यानंतर देखील अर्जदाराने कागदपत्रांची पूर्तता न केल्यास सदर अर्ज निकाली काढावा अर्थात कागदपत्रांची पुर्तता करणेस दिलेले ३० दिवस ही अंतीम तारीख असेल असे स्पष्ट नमुद केले आहे. मे. अक्षर कॉर्पोरेशनचे मालक यांनी सदरचा आवश्यक असलेला संयुक्त घाऊक परवाना प्राप्त न केल्याचे सुनावणीच्यावेळी कबुल केले आहे. तसेच तपासी पोलिस अधिकारी यांच्या तपासातही निष्पन्न झाले आहे. यावरुन त्यांनी घाऊक परवाना मिळण्याकरीता अर्ज करुन फक्त सोपस्कार पुर्ण केल्याचे दिसुन येत असुन त्यांनी सुमारे १९ महिने विनापरवाना व्यवसाय केला असल्याने त्यांना सदरचा परवाना प्राप्त करुन घेण्याकरीता स्वारस्य नसल्याचे स्पष्ट होत आहे. मे. अक्षर कॉर्पोरेशन यांचा जप्त करण्यात आलेला तांदळाचा साठा त्यांनी नवीन परवान्याकरिता केलेल्या अर्जामधील नमूद पत्त्यावर साठवणूक न करता मे. कामधेनू इंटरप्रायझेस या गोदामामध्ये साठेबाजीच्या उद्देशाने अवैध साठवणूक केल्याचे सिध्द होत आहे. सबब, मे. अक्षर कॉर्पोरेशनचे मालक यांनी बेकायदेशीररित्या विनापरवाना अवैध साठवणूक करुन त्यांनी महाराष्ट्र अनुसुचीत वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या तरतूदींचा भंग केल्याचे निष्पन्न होत असल्याने त्यांचा जप्त करण्यात आलेला तांदळाचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. शहा सप्लायर्स, मे. प्रकाश कॉर्पोरेशन, मे. रघुवीर राईस ट्रेडर्स, मे. राजेश्वर ट्रेडर्स, मे. भद्रा ट्रेडर्स, मे. वरदान राईस ट्रेडर्स, मे. कटारीया कॉर्पोरेशन व मे. पुजा ट्रेडिंग कंपनीचे मालक यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा नमूद गोदामात तांदळाचा साठा जप्त असून सदरचा साठा त्यांनी मे. कामधेनू इंटरप्रायझेस या गोदामात साठवणुक केल्याचे सांगितले. निवेदनासोबत नमुद साठामालकांनी विविध परवाने तसेच सादर केलेल्या साठ्याच्या खरेदी बिलांच्या छायांकीत प्रतींचे अवलोकन करता महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये त्यांनी अन्नधान्याच्या व्यवसायाकरीता घाऊक परवाना घेतला असुन सदर परवान्यांवर वेगळया गोदामांची नोंद निरंक असल्याचे दिसुन येते. नमुद परवानाधारकांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे असुन शासनाची दिशाभुल करणारे आहे. अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय

इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." तथापी, वरील आस्थापनांच्या मालकांपैकी मे. कटारीया कॉर्पोरेशन यांनी दिनांक २३/०७/२०१२ रोजी व मे. पुजा ट्रेडिंग कंपनी यांनी दिनांक २५/०७/२०१२ रोजी, म्हणजेच या कार्यालयाच्या वतीने करण्यात आलेल्या जप्तीच्या कारवाई नंतर त्यांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे या अनुज्ञप्तीप्राधिकारी यांच्या कार्यालयात मे. कामधेनू एंटरप्रायझेस या गोदामात त्यांचा तांदळाचा साठा ठेवल्याबाबतचे सुचनापत्र सादर करुन सोपस्कार पुर्ण केले व उर्वरीत साठामालकांनी त्यांचा साठा नमूद गोदामात साठवणूक केल्याबाबतचे सुचनापत्रही सादर न केल्याचे दिसुन येते. उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या परवानाधारकनिहाय परिपुर्ण अहवालात, सदर साठा मालकांनी नमुद वेअरहाऊसमध्ये साठवणुक केल्याबाबतचे सुचनापत्र त्यांच्या कार्यालयात सादर न केल्याबाबत अथवा तपासणी नंतर सादर केल्याने याप्रकरणी त्यांचे अर्ज ग्राहय धरता येणार नाही असे नमुद केले आहे.

सबब, मे. शहा सप्लायर्स, मे. प्रकाश कॉर्पोरेशन, मे. रघुवीर राईस ट्रेडर्स, मे. राजेश्वर ट्रेडर्स, मे. भद्रा ट्रेडर्स, मे. वरदान राईस ट्रेडर्स, मे. कटारीया कॉर्पोरेशन व मे. पुजा ट्रेडिंग कंपनी या आठही साठा मालकांनी साठेबाजीच्या उद्देशाने अवैध साठवणुक करुन स्थानिक बाजारपेठेत कृत्रिम टंचाई निर्माण करुन जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे सिध्द झाले आहे. सदर परवाना धारकांनी त्यांच्या परवान्यावरील नमुद पत्त्याव्यतिरीक्त अन्य ठिकाणी साठवणुक केल्याचे सुचनापत्र सादर केले नाही अथवा परवान्यावर गोदामांची नोंद करुन न घेतल्याने त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ अन्वये त्यांना देण्यात आलेल्या परवान्यामधील तरतुदींचा व त्यामधील अटी/शर्तीचा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चा भंग केल्याचे सिध्द झाल्याने मे. शहा सप्लायर्स, मे. प्रकाश कॉर्पोरेशन, मे. रघुवीर राईस ट्रेडर्स, मे. राजेश्वर ट्रेडर्स, मे. भद्रा ट्रेडर्स, मे. वरदान राईस ट्रेडर्स, मे. कटारीया कॉर्पोरेशन व मे. पुजा ट्रेडिंग कंपनी या सर्व साठामालकांचा जप्त करण्यात आलेला तांदळाचा संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मे. कामधेनू इंटरप्रायझेसचे भागीदार मनोज नानजी भानुशाली यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात त्यांच्या वेअरहाऊसमध्ये अन्नधान्याचा व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांनी शिधावाटप यंत्रणेच्या नियमांचा भंग केल्याने कारवाई करुन मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असल्याने त्यांचा साठा शासनजमा करण्यात का येऊ नये, याबाबत विचारणा करण्यासाठी साठामालकांना सुनावणीस पाचारण करण्यात यावे. सदरचा साठा इतर व्यक्तींचा असून त्यांच्याकडे साठवणुकीचा परवाना असल्याने त्यांनी सदर साठ्याची त्यांच्या वेअर हाऊसमध्ये साठवणूक करण्याची परवानगी देऊन कोणत्याही नियमांचा भंग केला नसल्याचे नमूद केले. सदर वेअर हाऊसमध्ये जीवनावश्यक वस्तू नसल्याने जर घटनास्थळी जीवनावश्यक वस्तूचा साठा मिळाला असता तर साठा जप्त करण्याचे अधिकार असल्याचे सांगितले. यावरुन त्यांनी

सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व शासनाची दिशाभुल करणारे आहे. मे. कामधेनू इंटरप्रायझेसचे भागीदार यांनी त्यांच्या वेअरहाऊसमध्ये विविध व्यापाऱ्यांचा अनुसुचित वस्तुंचा साठा हा साठवणुक करुन घेतांना सदरहु साठा मालकांनी त्यांच्या घाऊक परवान्यावर मे. कामधेनू इंटरप्रायझेस या अतिरिक्त गोदामाची नोंद केली आहे किंवा कसे? याची खातरजमा करणे तसेच त्यासंबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रे घेणे आवश्यक होते. तथापी, मे. कामधेनू इंटरप्रायझेसचे भागीदार यांनी याबाबत संबंधित परवाना धारकांकडून सदर बाबत पूर्तता करुन न घेता अथवा संबंधित परवानाधारकास पुर्तता करुन घेण्यास आवश्यक करारनामा इ. कागदपत्रे उपलब्ध करुन न देता त्यांनी त्यांच्या गोदामात अवैध साठवणुक व साठेबाजीच्या उद्देशाने साठवणुक केलेल्या साठामालकास गैरमार्गाने मदत करुन त्यांनी स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न होत आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०५९/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u> :-**

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. कृपा ट्रेडर्स यांचा ३२७०० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. ओम सोम फुड यांचा ५६५०० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. आशापुरा ट्रेडर्स यांचा ७४७०० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

४) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. धिरजलाल विरजी ॲन्ड कंपनी यांचा ३१९२५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

५) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. एस के ॲन्ड कंपनी यांचा २१०५७५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

६) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. अरविंद ट्रेडिंग कंपनी यांचा १६२९७५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

७) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. महाविर ट्रेडर्स यांचा ४०५४५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

८) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. चंदरकुमार ओमप्रकाश यांचा १४९९५५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

९) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. शुभम फुड्स यांचा ५९८२५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

१०) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. अक्षर कॉर्पोरेशन यांचा २७३७५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

११) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. शहा सप्लायर्स यांचा १०६७५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. प्रकाश कार्पोरेशन यांचा २०९०० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. रघुवीर राईस ट्रेडर्स यांचा ५००० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१४) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. राजेश्वर ट्रेडर्स यांचा १७९९७० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१५) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. भद्रा ट्रेडर्स यांचा १५८७० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१६) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. वरदान राईस ट्रेडर्स यांचा ५०८२० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१७) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. कटारीया कॉर्पोरेशन यांचा ९६७५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१८) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. पुजा ट्रेडिंग कंपनी यांचा १३३५० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१९) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण तांदळाचा साठा पोलिसांनी, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

CONTROLLER OF RATIONING & ... HEAD OFFIC... MUMBAI

प्रति,
१) मे. कामधेनू इंटरप्रायझेसचे भागीदार मनोज नानजी भानुशाली
२) कृपा ट्रेडसचे मालक
३) ओम सोम फुडचे मालक
४) शहा सप्लायरचे मालक
५) प्रकाश कॉर्पोरेशनचे मालक
६) आशापुरा ट्रेडर्सचे मालक
७) धीरजलाल वीरजी अॅन्ड कंपनीचे मालक
८) पुजा ट्रेडिंग कंपनीचे मालक
९) एस.के. अॅण्ड कंपनीचे मालक
१०) अक्षर कॉर्पोरेशनचे मालक
११) अरविंद ट्रेडिंगचे मालक
१२) महावीर ट्रेडर्सचे मालक
१३) चंदरकुमार ओमप्रकाशचे मालक
१४) शुभम फुडसचे मालक
१५) रघुवीर राईस ट्रेडर्सचे मालक
१६) राजेश्वर ट्रेडर्सचे मालक
१७) भद्रा ट्रेडर्सचे मालक
१८) वरदान राईस ट्रेडर्सचे मालक
१९) कटारीया कॉर्पोरेशनचे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना वरील नमुद दोषी परवानाधारकांवर तसेच जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.

५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.